व सूचना नोंदवावयाच्या असतील, त्यांनी त्यांच्या हरकती व सूचना नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ ह्यांचेकडे नोंदवाव्यात हरकती व सूचना ह्या सदर नोटीस शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांपर्यंत लेखी स्वरूपात पाठविण्यात याव्यात. ३० (तीस) दिवसांच्या विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.

**ओमप्रकाश बकोरीया,**
प्र. महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे.

पुणे, १९ ऑगस्ट २०१४.

---

## PUNE MUNICIPAL CORPORATION, PUNE

No. 810/2014/*Corrigendum.*— As per the Resolution No. 716, dated 24th January 2014 made by the General Body of Pune Municipal Corporation, modification under Section 37 *(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 regarding provisions for metro in sanctioned Development Control Regulations of Pune City was published in Maharashtra Government Gazette Suppliment Part-I, dated July 24th to 30th 2014. on page 30 to 36, by Commissioner Pune Municipal Council Letter No. 625/2014 on14th July 2014. The published content in 'N-2.5.A.9 Note-iii' is amended as below.—

| | Published content | Amended content |
|---|---|---|
| 'N-2.5.A.9 Note-iii' | Rehabilitation of slum dwellers which are coming under metro influence zone, shall be carried out as per BSUP regulations under JNNURM project. | Rehabilitation of slum dwellers which are coming under metro influence zone, shall be carried out as per BSUP regulations under JNNURM project and also in various other rehabilitation schemes under taken by Pune Municipal Corporation and State Government. |

Any suggestions and/or objections for the above *corrigendum* and the notification published in daily news paper Sakal and Indian Express on 12th July 2014 and also in Government Gazette No. Ja. San.Ka./625/2014 on 14th July 2014 may be communicated in writing to the office of the City Engineer, Pune Municipal Corporation, Shivajinagar, Pune-05 within a period of 30 (thirty)days from the date of this notice in the Government Gazette. Suggestions/Objections received after the stipulated period of 30 (thirty) days shall not be considered.

**OMPRAKASH BAKORIA,**
I/C Municipal Commissioner,
Pune Municipal Corporation, Pune.

Pune, 14th August 2014.

---

अपर आयुक्त यांजकडून

जिल्हा सातारा

क्रमांक भूसं/आरआर-२/एसआर-१४७/२०१४/दुरुस्ती.— मौजे वाण्याचीवाडी, तालुका कराड, जिल्हा सातारा येथील जमिनी उर्ध्व आरफळ कालवा, लघुवितरिका, सा. क्र. ६५/६०५-वाण्याचीवाडी, मायनर कामासाठी व सा. क्र. ६६/००-सरळ विमोचक या सार्वजनिक प्रयोजनासाठी अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांची भूसंपादन कायदा कलम ६ ची अधिसूचना क्रमांक भूसं/आरआर-२/एसआर-७०/२०१४, दिनांक २० मार्च २०१४ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग १, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक मार्च २७ ते एप्रिल २, २०१४ रोजी पृष्ठ १० ते १२ वर प्रसिद्ध झालेली आहे. त्यामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

अनुसूची

जिल्हा सातारा, तालुका कराड, गाव वाण्याचीवाडी

या ऐवजी

| गट नंबर | आवश्यक जमिनीचे अदमासे क्षेत्र | दिशा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | हे. आर/ चौ. मी. | |
| ३० पैकी | .. ० ००.४ | पश्चिम |

अनुसूची— चालू

असे वाचावे

| गट नंबर | आवश्यक जमिनीचे अदमासे क्षेत्र | दिशा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | हे. आर/ चौ. मी. | |
| ३० पैकी | .. ० ००.०४ | पश्चिम |

**श्याम देशपांडे,**
अपर आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, १९ ऑगस्ट २०१४.

---

जिल्हा सातारा

क्रमांक भूसं/आरआर-२/एसआर-१४८/२०१४/दुरुस्ती.— मौजे वडोली भिकेश्वर, तालुका कराड, जिल्हा सातारा येथील जमिनी आरफळ कालवा मसूर वितरिका, सा. क्र. ६४/९८० चे कामासाठी संपादन या सार्वजनिक प्रयोजनासाठी अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांची भूसंपादन कायदा कलम ६ ची अधिसूचना क्रमांक भूसं/आरआर-२/एसआर-८२/२०१४, दिनांक ३ एप्रिल २०१४ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक एप्रिल १७ ते २३, २०१४ रोजी पृष्ठ ३ ते ४ वर प्रसिद्ध झालेली आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

अनुसूची

जिल्हा सातारा, तालुका कराड, गाव वडोली भिकेश्वर

या ऐवजी

| भूसंपादन गट क्रमांक व वसती | | आवश्यक जमिनींचे अदमासे क्षेत्र | दिशा |
|---|---|---|---|
| १ | | २ | ३ |
| नवा गट | जुना गट | हे. आर/चौ. मी. | |
| ४१५ पैकी | ४९५ पैकी | .. ० ०१२ | पश्चिम बाजूने |

असे वाचावे

| भूसंपादन गट क्रमांक व वसती | | आवश्यक जमिनींचे अदमासे क्षेत्र | दिशा |
|---|---|---|---|
| १ | | २ | ३ |
| नवा गट | जुना गट | हे. आर/चौ. मी. | |
| ४१५ पैकी | ४९५ पैकी | .. ० १२ | पश्चिम बाजूने |

**श्याम देशपांडे,**
अपर आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, १९ ऑगस्ट २०१४.

---

जिल्हा सातारा

क्रमांक भूसं/आरआर-२/एसआर-१४४/२०१४.— ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), क्रमांक २, सातारा यांनी त्यांची अधिसूचना क्रमांक एलएक्यू-२/एसआर-६७६/२०१३, दिनांक १५ जून २०१३ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक जून २७ ते जुलै ३, २०१३ रोजी पृष्ठ २ ते ३ याद्वारे असे अधिसूचित केले होते की, सोबतच्या अनुसूचीमध्ये ज्यांचा तपशील नमूद करण्यात आला आहे अशा जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) उक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक होत्या किंवा आवश्यक असण्याचा संभव होता ;

आणि ज्याअर्थी, भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा एक) (यात यापुढे ज्याचा निर्देश "संपादन अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना त्याच्या कलम ५-अ, पोट-कलम *(२)* अन्वये अहवाल पाठविण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांचा अहवाल विचारात घेतल्यानंतर पुणे विभागाच्या अपर आयुक्तांची अशी खात्री झालेली आहे की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळ, पुणे यांच्या खर्चाने संपादन करणेची आवश्यकता आहे ;

त्याअर्थी, आता, संपादन अधिनियमाच्या कलम ६ च्या उपबंधान्वये, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत. उक्त जमिनींच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्याकरिता संपादन अधिनियमाच्या कलम ३, खंड *(ग)* अन्वये, याद्वारे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), क्रमांक २, सातारा यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्याला, त्याने उक्त जमिनींच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही त्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी असे निदेश देण्यात येत आहेत.

उक्त जमिनींचे नकाशे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), क्रमांक २, सातारा यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

अनुसूची

**जिल्हा सातारा, तालुका खंडाळा, गाव मोर्वे**

| भूसंपादन गट क्रमांक व वसती | आवश्यक जमिनींचे अदमासे क्षेत्र | दिशा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | हे. आर | |
| २७५ पैकी | .. ० ०७ | पश्चिम |
| पो. ख. | .. ० ०१ | |
| २७६ पैकी | .. ० ०९ | पूर्व |
| २७३ पैकी | .. ० १० | मध्य |
| पो. ख. | .. ० ०१ | |

झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल सक्षम प्राधिकारी तथा उपआयुक्त विभाग, क्रमांक १, पुणे महानगरपालिका यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र जा. क्र. उआविक्र. १/८४, दिनांक ७ मे २०१४ अन्वये सादर केलेला आहे. अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतींवरील झोपडपट्टीव्याप्त क्षेत्रालगत विकसकाच्या मालकीचे झोपडपट्टी नसलेले बोजाविरहीत, खुले क्षेत्र असून या एकत्रित क्षेत्रावर म्हणजेच झोपडपट्टीव्याप्त क्षेत्र व झोपडपट्टी विरहित खुले क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूर नियमावलीच्या विशेष नियम १० *(२)* प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची संयुक्त योजना राबविणेकरिता मंजुरी मिळावी, अशी विनंती विकसकाने केल्याने व अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या क्षेत्रावर झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेयोग्य परिस्थिती असलेमुळे अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असलेबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी, ओमप्रकाश बकोरीया, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३-क *(१)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचीमध्ये नमूद केलेले ६,२१२.९८ चौ. मी. क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिद्ध झालेपासून चार आठवड्यांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३-क *(२)* अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

(नगर भूमापन अधिकारी क्रमांक १/अतितातडी/मो.र.नं. ९५९४/१४, दिनांक ५ फेब्रुवारी २०१४ प्रमाणे)

| जमिनींचा तपशील | | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | चौ. मी. |
| सर्व्हे नंबर १५६ १-अ/१/१ पैकी न.भू.क्र. ११०५ पैकी, औंध, पुणे शहर. | झोपडपट्टीव्याप्त क्षेत्र | २,५२८.५१ |
| | झोपडपट्टी बोजाविरहित क्षेत्र | ३,६८४.४७ |
| | एकूण क्षेत्र | ६,२१२.९८ |

### चतु:सीमा

पूर्व — लागू रस्ता व लागू न.भू.क्र. ११०५ पैकी
पश्चिम — लागू न.भू.क्र. ११०५ पैकी
उत्तर — लागू न.भू.क्र. ११०४
दक्षिण — लागू न.भू.क्र. ११०५ पैकी

प्रस्तुत योजनेसंबंधीची सर्व कागदपत्रे व योजना क्षेत्राचा नकाशा पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

प्रस्तुत आदेश हा माझ्या सही-शिक्क्यानिशी देण्यात आला आहे.

**ओमप्रकाश बकोरीया,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १४ ऑगस्ट २०१४.

---

## प्रभारी महापालिका आयुक्त यांजकडून

### पुणे महानगरपालिका, पुणे

क्रमांक जसंका/८१०/२०१४/दुरुस्ती.--मेट्रो विकसनाबाबत पुणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(१)* अन्वये मा. मुख्य सभा, पुणे महानगरपालिका, ठराव क्रमांक ७१६, दिनांक २४ जानेवारी २०१४ च्या अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-एक पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक जुलै २४ ते ३०, २०१४ रोजी पृष्ठ ३० ते ३६ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्या जाहीर प्रकटनामधील कलम 'N-2.5.A.9 Note-iii' मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

| | प्रसिद्ध मसुदा | सुधारित मसुदा |
|---|---|---|
| 'N-2.5.A.9 Note-iii' | Rehabilitation of slum dwellers which are coming under metro influence zone shall be carried out as per BSUP regulations under JNNURM project. | Rehabilitation of slum dwellers which are coming under metro influence zone, shall be carried out as per BSUP regulations under JNNURM project and also in various other rehabilitation schemes undertaken by Pune Municipal Corporation and State Government. |

उपरोक्त शुद्धीपत्रकासह दिनांक १२ जुलै २०१४ रोजी दैनिक सकाळ व दै. इंडियन एक्सप्रेसमध्ये, तसेच क्रमांक जसंका/६२५/२०१४ अन्वयेच्या दिनांक १४ जुलै २०१४ रोजी शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या मुळ जाहीर प्रकटनासंदर्भात ज्या नागरिकांना हरकती

***Schedule*—contd.**

| Gat No. | | Area | |
|---|---|---|---|
| 1 | | 2 | |
| | | Hectare | |
| 156 | .. | 1 | 23 |
| 158 | .. | 2 | 41 |
| 122 | .. | 0 | 79 |
| 159/1 | .. | 2 | 60 |
| 92 | .. | 4 | 00 |
| 93/1 | .. | 3 | 49 |
| 94 | .. | 4 | 04 |
| 95 | .. | 1 | 62 |
| 96 | .. | 2 | 36 |
| 97 | .. | 2 | 83 |
| 98 | .. | 0 | 80 |
| 121 | .. | 4 | 26 |
| 147 | .. | 0 | 53 |
| 148 | .. | 0 | 83 |
| 153 | .. | 1 | 82 |
| 155 | .. | 0 | 52 |
| 157/1 | .. | 1 | 42 |
| 157/2 | .. | 0 | 81 |
| Total Area | .. | 43 | 12 |

**BHARAT WAGHMARE,**
Deputy Collector (Revenue),
Satara.

Satara, 11th August 2014.

---

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश

क्रमांक झोपुप्रा/तां. १/झोपुप्रा/प्र. क्र. १६८/१४४५/२०१४.--ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता "उपरोक्त अधिनियम" असा करण्येत येत आहे) चे कलम ३-अ *(१)*, *(२)* अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्रमांक झो.पु.यो.-२००४/प्र. क्र.-२१३/झो.प.सु.-१, दिनांक ३० जून २००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३-ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना दिनांक १ डिसेंबर २००५ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अंतिमतः प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतींवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी मे. लाईफ प्रॉपर्टीज या विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांकडे दिनांक २ मे २०१३ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे क्षेत्रापैकी २,९६५ चौ. मी. क्षेत्र विकसकाने हवल-११/६६५८/२००९, दिनांक ३१ जुलै २००९, ९०० चौ. मी. क्षेत्र विकसकाने हवल-१०/५३०६/२०१३, दिनांक ६ मे २०१३, २४०२ चौ. मी. क्षेत्र विकसकाने हवल-९/९७२१/२०१३, दिनांक १० ऑक्टोबर २०१३, १०० चौ. मी. क्षेत्र विकसकाने हवल-१९/२०१८/२०१४, दिनांक ३ मार्च २०१४ या नोंदणीकृत दस्तऐवजाअन्वये असे एकूण ६,३६७ चौ. मी. क्षेत्र खरेदी केलेले असून त्याची नोंद स. नं. १५६, १-अ/१/१ या मिळकतीच्या ७/१२ च्या अभिलेखसदरी फेरफार क्रमांक अनुक्रमे ४१६१, ४३९६, ४३९७, ४४३७ झालेली असून अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतींच्या ७/१२ च्या कब्जेदारसदरी मे. लाईफ प्रॉपर्टीज भागीदारी संस्थेतर्फे श्री. चंद्रकांत काशिनाथ केले यांच्या नावाची नोंद झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यानी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतींवरील झोपडपट्टीव्याप्त क्षेत्राबाबत परिशिष्ट-२, दिनांक ४ मार्च २०१४ रोजी निश्चित केले असून, उपरोक्त परिशिष्ट-२ नुसार एकूण ९५ झोपडीधारकांपैकी (८२ निवासी झोपडीधारक + ४ संयुक्त झोपडीधारक + ९ बंद झोपड्या) ६४ झोपडीधारक (६० निवासी + ४ संयुक्त निवासी) पुनर्वसनास पात्र ठरलेले आहेत व २२ निवासी झोपडीधारक अपात्र ठरलेले आहेत. ६४ पात्र झोपडीधारकांपैकी ४८ झोपडीधारकांनी (७५ टक्के) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसकास संमती दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतींच्या २,७०२ चौ. मी. इतक्या घोषित क्षेत्रापैकी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या १७५९.४८ चौ. मी. घोषित क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने व याव्यतिरिक्त अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवरील ७६९.०३ चौ. मी. अघोषित क्षेत्रावर झोपडपट्टी असलेमुळे, या झोपडपट्टीबाबत